सुधारणा व पुनर्वसन

**जनसंपर्क अधिकारी कार्यालय, कारागृह मुख्यालय, पुणे**

**P.R.O. Office, Prison Head Office, Pune**

**Address -** Office of The Additional Director General of Police and Inspector General of Prison and Correctional Services, 2nd Floor, Old Central Building, Pune – 1

E-mail ID : igoffice.ecell-mh@gov.in

Ph. No. 020 26124815

**प्रेस नोट क्रमांक : 06/2024 दिनांक : 03/03/2024**

## प्रेस नोट

## "पुणे सिटी मॅरेथॉन २०२४" मध्ये कारागृह विभागाचा उत्स्फूर्त सहभाग

दिनांक ०३ मार्च २०२४ रोजी पुना सिटी क्लब तर्फे " पुणे सिटी मॅरेथॉन 2024" आयोजित करण्यात आली होती. "पुणे सिटी मॅरेथॉन 2024" मध्ये तीन प्रवर्गात ही मॅरेथॉन स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. त्यामध्ये 03कि.मी. (फॅमिली रन), 05 कि.मी. (फन रन), 10 कि.मी. (एमपावर रन) आणि 21 कि.मी. (लेजंड रन) अशा विभागात पुणे सिटी मॅरेथॉन चे वर्गीकरण केले होते.

समाजकार्य करणाऱ्यांच्या मदतीसाठी धावणारा पुणेकर पुणे, 03 मार्च २०२४: 'द पूना क्लब लिमिडेट' यांच्या तर्फे व सदर्न कमांड पुणे यांच्या सहकार्याने आयोजित पुणे सिटी मॅरेथॉन स्पर्धेत 12000 धावपटूंनी आपला सहभाग नोंदवला होता. अशा प्रकारच्या भव्य मॅरेथॉन स्पर्धेची संकल्पना क्लबच्या वतीने प्रथमच प्रत्यक्षात आली असे पुना क्लबचे अध्यक्ष सुनील हांडा यांनी सांगितले असून मुख्य कमांडर मा. ए. के. सिंग, सदर्न कमांड यांचे हस्ते झेंडा दाखवून मॅरेथॉन स्पर्धेचे उद्घाटन झाले आणि मा.अमिताभ गुप्ता, अपर पोलीस महासंचालक व महानिरीक्षक, कारागृह व सुधारसेवा यांच्या हस्ते 21 किमी (लेजंड रन) या मुख्य स्पर्धेस झेंडा दाखवून सुरुवात करण्यात आली. या स्पर्धेकरीता सामान्य जनते बरोबरच भारतीय वायू सेना, पुणे पोलिस, कारागृह विभाग, वायरलेस, पुणे, पुणे महानगरपालिका, जीएसटी विभाग आणि इन्कम टॅक्स स्पोर्ट्स ॲण्ड रेक्रिशन क्लब, पुणे यांसारख्या शासकीय संस्थेतील अधिकारी व कर्मचारी यांनी उत्सुर्फतपणे सहभाग नोंदविला होता.

स्पर्धेचे उद्घाटन करताना कारागृह प्रमुखांनी मॅरेथॉन स्पर्धेच्या आयोजकांचे कौतुक केले व पहाटे जमलेल्या स्पर्धकांचा उत्साह वाढविला तसेच मुंबई मॅरेथॉन इंटर नॅशनल स्तरावर प्रसिध्द असून त्याच धर्तीवर पुणे मॅरेथॉन देखील आंतरराष्ट्रीय स्तरावर प्रसिध्द व्हावी अशा शुभेच्छा दिल्या. दोराबजी चॅरिटेबल ट्रस्टकडून अशा प्रकारच्या मॅरेथॉन स्पर्धेचे आयोजन प्रथमच करण्यात आले असून सर्व शासकीय अधिकारी व कर्मचारी यांचा देखील स्पर्धेस अभूतपूर्व प्रतिसाद मिळाला व त्यामध्ये कारागृह विभागाचा समावेश होता.

तसेच पुणे सिटी मॅरेथॉन 2024 मध्ये प्रथमच कारागृह विभागाने देखील सहभाग घेतला होता. या स्पर्धेमध्ये मा.श्री. अमिताभ गुप्ता, (भा.पो.से.), अपर पोलीस महासंचालक व महानिरीक्षक, कारागृह व सुधारसेवा, महाराष्ट्र राज्य यांनी 10 कि.मी. (एमपावर रन) मध्ये सहभाग घेतला. तसेच मा.श्री. डॉ. जालिंदर सुपेकर, (भा.पो.से.), विशेष पोलीस महानिरीक्षक, (मुख्यालय), कारागृह व सुधारसेवा, महाराष्ट्र राज्य,पुणे व त्यांची पत्नी सौ. पूनम सूपेकर यांनीदेखील 05 कि.मी. (फन रन) मध्ये सहभाग घेतला.तसेच सदर स्पर्धेमध्ये श्री.सुनिल ढमाळ, अधीक्षक, येरवडा मध्यवर्ती कारागृह, श्री.नितीन वायचळ, प्राचार्य, दौलतराव जाधव तुरुंग

अधिकारी प्रशिक्षण महाविद्यालय, येरवडा, पुणे व श्री. अनिल खामकर, अधीक्षक, येरवडा खुले कारागृह हे देखील उपस्थित होते. तसेच मा.श्री. अमिताभ गुप्ता, अपर पोलीस महासंचालक व महानिरीक्षक, कारागृह व सुधारसेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी दिलेल्या प्रोत्साहनामुळे प्रथमच कारागृह विभागातील अधिकारी व कर्मचारी यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदविला असून कारागृह विभागासारख्या ताणतणावाचे सेवेमध्ये अशाप्रकारे आरोग्याचे महत्व पटवून देणा-या उपक्रमात भाग घेता आल्याने त्यांचेमध्ये उत्साहाचे व आनंदाचे वातावरण दिसून आले. सर्वांना आरोग्यदायी व पर्यावरणपुरक आयुष्य मिळावे यासाठी अशा प्रकारचे उपक्रम निरोगी समाजासाठी निश्चितच लाभदायी आहेत.


CONCEPTUALISED BY
The Poona Club Ltd.
PUNE CITY MARATHON
SUNDAY, 3RD MARCH 2024
EXECUTED BY
DORABJEE CHARITABLE TRUST
#PUNECITYMARATHON
PCM2024-HALF MARATHON
RUN FOR A


PUNE CITY MARATHON
32957
PUNE CITY MARATHON
33398
5325